**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२**

अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तसेच सहभागी झालेल्या होतकरू खेळाडूंना प्रशिक्षण व इतर बाबीसाठी आर्थिक सहाय्य देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः क्रीडाधो-३११३/प्र. क्र. २९/क्रीयुसे-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २८ एप्रिल, २०१४.

**वाचा -**

१) शासन निर्णय , समाजकल्याण व क्रीडा विभाग क्रमांक-राक्रीधो-१०९६/ प्र.क्र.३३०/क्रीयुसे-१, दिनांक ३१ जुलै,१९९७.
२) शासन निर्णय , सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभाग क्रमांक-राक्रीधो-२००३/प्रक्र १६८/ क्रीयुसे-१, दि. ५ डिसेंबर २००३.
३) शासन निर्णय , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक-क्रीडाधो-२०११/ प्र.क्र.५५/११/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून,२०१२,

**प्रस्तावना -**

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. त्यादृष्टीने राज्याचे स्वतंत्र क्रीडा धोरण १९९६ मध्ये जाहीर करण्यात आले. अशा प्रकारे क्रीडा धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. त्यामध्ये वेळोवेळी परीस्थितीनुसार झालेले क्रीडा बदल विचारात घेऊन सन २००१ मध्ये सुधारित धोरण निश्चित करून क्रीडा विकासाच्या भरीव योजनांची आखणी करण्यात आली. त्याचा दृश्य परिणाम दिसून महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्रात अग्रगण्य राज्य म्हणून नावलौकीक झाला. दरम्यानच्या कालावधीत आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा विश्वात झालेले बदल विचारात घेऊन व क्रीडा क्षेत्रात राज्याचा नावलौकीक कायम ठेवण्यासाठी अद्ययावत क्रीडा धोरण करण्याची गरज निर्माण झाली. राज्यातील खेळांडूनी आंतराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करून पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडुंच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभूत सुविधा, खेळाडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवून क्रीडा धोरण २०१२ तयार करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक १४.६.२०१२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.राज्यातील खेळाडूंना अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच अत्युत्कृष्ट कामगिरी दाखविण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना उपरोक्त दि. ३१.७.१९९७ व दि. ५ डिसेंबर २००३ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या योजनेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

त्यानुसार दिनांक ३१.७.१९९७ व दि. ५ डिसेंबर, २००३ चे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंना आर्थिक सहाय्य देण्याच्या योजनेस खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे.

या योजनेस अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील खेळाडूंना आर्थिक सहाय्य देणे, असे संबोधण्यात यावे.

**१. या योजनेसाठी खालील स्पर्धा अधिकृत स्पर्धा म्हणून गणल्या जातील :-**

| | | |
|---|---|---|
| १) ऑलंपिक गेम्स् | ५) राष्ट्रकुल युवा स्पर्धा | ९) शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा |
| २) विश्व अजिंक्यपद स्पर्धा | ६) एशियन चॅम्पियनशिप | १०)पॅरा ऑलंम्पिक स्पर्धा |
| ३) एशियन गेम्स् | ७) युथ ऑलंम्पिक | ११) पॅरा एशियन स्पर्धा |
| ४) राष्ट्रकुल स्पर्धा | ८) ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा | १२) ज्युनियर एशियन चॅम्पियनशीप |
| १३) एशियन कप | १४) वर्ल्ड कप | |

ऑलंम्पिक स्पर्धेमध्ये ज्या खेळ /क्रीडा प्रकारांचा समावेश असेल तेच खेळ /क्रीडा प्रकार वरील नमूद इतर स्पर्धामध्ये आर्थिक सहाय्य मिळण्यास अनुज्ञेय होतील. मात्र अपवाद कबड्डी, खो-खो, मल्लखांब या देशी खेळांचा अपवाद करणेत येत आहे.

**२. वरील स्पर्धा /खेळ क्रीडा प्रकारासाठी खालील बाबींना अर्थसहाय अनुज्ञेय राहील.**

(i) आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास भोजन इ.

(ii) देश विदेशातील स्पर्धापूर्व प्रशिक्षण, प्रशिक्षण उपकरणे, तज्ञ क्रीडा प्रशिक्षकांचे मागदर्शन शुल्क, प्रशिक्षण कार्यक्रम शुल्क

(iii) आधुनिक क्रीडा साहित्य आयात / खरेदी करणे, गणवेश इत्यादी.

**३. आर्थिक सहाय्यासाठी खेळाडूंची पात्रता -**

१. संबंधित खेळाडू महाराष्ट्राचा १५ वर्षाचा रहिवासी असावा.

२. सदर खेळाडूंनी मागील तीन वर्षात कनिष्ठ / वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करुन किमान एकदा पदक मिळविणे आवश्यक आहे.

३. भारतीय शालेय खेल महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्यावतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधित खेळाडूकडे असावे. निमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धांसाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही.

४. खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेत नविन विक्रम प्रस्थापित केला असेल असा अधिकृत स्पर्धेतील खेळाडू.

## ४. <u>आर्थिक सहाय्याचे स्वरूप</u>

### अ. <u>सहभागासाठी आर्थिक सहाय</u>

वरील अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागासाठी पात्र होणा-या खेळाडूंना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा कमाल रू. १.०० लाख, यापैकी कमी असेल ते अर्थसहाय्य मिळू शकेल. सदर अर्थसहाय्य क्रीडा प्रकार (वैयक्तिक/सांघीक) व स्पर्धा आयोजनाचे ठिकाण यावर अवलंबून राहील.

### ब. <u>प्रशिक्षण, साहित्य खरेदी इ. साठी आर्थिक सहाय</u>

वर नमूद केलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होणा-या/झालेल्या खेळाडूंना कामगिरी लक्षात घेऊन प्रशिक्षण, साहित्य खरेदी, मार्गदर्शक शुल्क इत्यादी साठी खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील:-

i) ऑलम्पिक स्पर्धा, विश्व अजिंक्यपद स्पर्धा, एशियन गेम्स, राष्ट्रकुल स्पर्धा या स्पर्धामध्ये सहभाग घेतलेल्या खेळाडूंसाठी देश विदेशातील प्रशिक्षण, व त्यासाठी निवास, भोजन, प्रवास, मार्गदर्शकांचे शुल्क क्रीडा साहित्य आयात करणे, गणवेश इ. प्रत्यक्ष खर्च अथवा कमाल रू. ५.०० लक्ष इतके अनुदान अनुज्ञेय राहील. सदर ५ लाखामध्ये क्रीडा साहित्य आयात करणे, गणवेश इ. बावी साठी प्रत्यक्ष खर्च अथवा कमाल रू. २.०० लक्ष अनुदान अनुज्ञेय असेल.

ii) राष्ट्रकुल युवा स्पर्धा, एशियन चॅम्पियनशीप, युथ ऑलिम्पिक, ज्यु. विश्व अजिंक्यपद स्पर्धा, शालेय आशियाई / जागतिक स्पर्धा, पॅरा ऑलिम्पिंक गेम्स, पॅरा एशियन स्पर्धा, वर्ल्ड कप, एशियन कप, ज्युनियर एशियन चॅम्पियनशीप या स्पर्धांमध्ये पात्र ठरलेल्या खेळाडूंना देश-विदेशातील प्रशिक्षण त्यासाठी निवास, भोजन, प्रवास, मार्गदर्शकाचे शुल्क, क्रीडा साहित्य आयात करणे, गणवेश इत्यादी बाबीसाठी प्रत्यक्ष खर्च अथवा कमाल रु.२.०० लाख अनुज्ञेय राहतील.

iii) राष्ट्रीय शालेय स्पर्धा (१७ व १९ वयोगट ) तसेच एकविध खेळ संघटनेच्या राष्ट्रीय स्तरावरील अजिंक्यपद स्पर्धेत गत तीन वर्षात किमान दोन सुवर्णपदक धारण करणा-या खेळाडूस वर परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांची तयारी करण्यासाठी विदेशामध्ये प्रशिक्षण, मार्गदर्शकांचे शुल्क, निवास, भोजन, प्रवास इकरिता. प्रत्यक्ष खर्च अथवा कमाल रू.२.०० लाखापर्यंत अनुदान देण्यात यंईल.

खेळाडूंच्या प्रशिक्षणाकरिता देशी / विदेशी प्रशिक्षकांना दोन तीन वर्षाकरिता मानधनावर कमाल मर्यादेच्या अधीन राहून करारावर नेमता येईल. मात्र प्रथम टप्प्यात शुटींग, ॲथलेटिक्स व कुस्ती या खेळांना प्राधान्य देण्यात येईल.

सदर खेळाडू राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त करित राहील तोपर्यंत अर्थसहाय मिळण्यास पात्र राहील

**५. निवडसमिती :-**

वर नमूद केलेल्या बाबींची पूर्तता करणाया- खेळाडूंना स्पर्धेचे स्वरूप, स्पर्धेचे ठिकाण इ. बाबी विचारात घेऊन पात्र खेळाडूंना अनुदान देण्यासाठी शासनास शिफारस करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त /संचालक, क्रीडा व युवक सेवा | अध्यक्ष |
| २. | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पूणे | सदस्य |
| ३. | अर्जुन पुरस्कारार्थी/ऑलंम्पियन/आंतरराष्ट्रीय खेळाडू | सदस्य |
| ४. | ऑलिम्पिक संघटनेचे एक प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (मुख्यालय) | सदस्य सचिव |

अशासकीय सदस्यांची नियुक्ती सदस्य सचिव यांनी शासन मान्यतेने करावी.

**६.** निवड समिती दर तीन महिन्यांनी खेळाडूंच्या कामगिरीचा आढावा घेऊन प्रगतीचे मूल्यमापन करेल. एखाद्या खेळाडूची कामगिरी त्याने सादर केलेल्या नियोजनानुसार समाधानकारक नसल्याचे आढळल्यास अनुदानाबाबत फेरविचार समितीमार्फत करण्यात येईल. तसेच सदर अनुदानाच्या रक्कमेचा दुरूपयोग केल्याचे निदर्शनास आल्यास अनुदानाची रक्कम व्याजासह वसूल करणे किंवा संबंधित खेळाडूवर योग्य ती कार्यवाही करणे याबाबतचा निर्णय समिती घेईल, व तो निर्णय संबंधित खेळाडू / संघटना यांच्यावर बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे ज्या खेळाडूंना परदेशातील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अर्थसहाय देण्यात आले आहे त्या खेळाडूंनी त्याबाबतचे विनियोग प्रमाणपत्र तातडीने सादर करणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत त्यांना आवश्यक ते बंधपत्र द्यावे लागेल.

निवड समितीच्या शिफारशीनुसार खेळाडूंना अनुदान मंजुर करण्याबाबतचा निर्णय, निधीच्या उपलब्धतेनुसार, शासनाच्या मान्यतेने घेण्यात येईल.

**७.** या योजनेच्या आर्थिक सहाय्य मंजूरीचे अधिकार संचालक/ आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना राहतील.

उपसंचालक(मुख्यालय), क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

या शासन निर्णयातील तरतूदी निर्णयाच्या दिनांकापासून लागू राहतील.

या योजनेकरिता होणारा खर्च "२२०४-क्रीडा व युवक कल्याण, १०४ क्रीडा व खेळ पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०८) खेळ व खेळाडूंना सहाय (०३) आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, मार्गदर्शकाचे शुल्क इ. साठी आर्थिक सहाय (२२०४ ५६५३)" या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा.

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक - १८६-१८७ व्यय-५, दिनांक २८.०२.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०४२९१८०८४००६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.04.29 18:12:34 +05'30'

( रा. चं. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. आयुक्त/संचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. महालेखापाल (लेखा परिक्षण) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
८. वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई,
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०.सर्व अधिकृत क्रीडा संघटना (संचालनालयामार्फत),
११.सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत),
१२.सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत),
१३.ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१४.मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१५.मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१६.निवड नस्ती (क्रीयुसे-१, क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३, अर्थसंकल्प शाखा).